आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

१४ मे २०२४ - मंगळवार

**ठळक बातम्या**

- मुंबईत घाटकोपर परिसरात जाहिरात फलक कोसळून झालेल्या दुर्घटनाप्रकरणी जाहिरात फलकाच्या मालकाविरोधात गुन्हा दाखल, राज्यभरात जाहिरात फलकांचं स्ट्रक्चरल ऑडिट करण्याचे आदेश

- मतदान केंद्रांवर जाण्यासाठी दिव्यांग मतदारांना मुंबईत मतदानाच्या दिवशी मोफत वाहतूक व्यवस्था

- उन्हाळी सुट्यांमुळे विधानपरिषदेच्या ४ जागांसाठीची निवडणूक लांबणीवर

**आणि**

- येत्या २ दिवसात राज्याच्या बहुतांश भागात पावसाची शक्यता, कोकणात उष्णतेच्या लाटेची शक्यता

**<><><><><>**

मुंबईत घाटकोपर परिसरात काल जाहिरात फलक कोसळून झालेल्या दुर्घटनेप्रकरणी दोषींविरोधात FIR दाखल झाला आहे. होर्डिंगच्या कंपनीचे मालक भावेश भिडे यांच्यासह कंपनीचे संचालक, अधिकारी आणि कर्मचारी यांच्याविरोधात दंड संहितेच्या विविध कलमांच्या अंतर्गत गुन्हा दाखल झाल्याची माहिती पंतनगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेश केवळे यांनी दिली. या सर्वांचा शोध सुरू आहे.

घाटकोपर दुर्घटनेतल्या मृतांचा आकडा १४ वर पोहोचला असून एकूण ७५ जण जखमी झाले आहे. काही जखमींवर उपचार करुन त्यांना घरी सोडण्यात आलं. दुर्घटना स्थळी अजूनही एनडीआरएफ, पोलीस, सीआरपीएफ, आणि अग्निशमन दलाचे जवान बचावकार्य करत आहेत. होर्डिंगच्या खाली अजूनही अनेक

गाड्या अडकल्या आहेत, आणि होर्डिंगचं वजन जास्त असल्यामुळे क्रेनच्या मदतीनं होर्डिंग उचलण्यावर मर्यादा येत असल्याची माहिती बचाव पथकातल्या कर्मचाऱ्यांनी दिली. राज्य सरकारनं मृत आणि जखमींच्या कुटुंबियाना मदत जाहीर केली आहे. पालकमंत्री मंगल प्रभात लोढा, विधानसभेतले विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, काँग्रेस नेते रमेश चेन्नीथला आणि नाना पटोले यांनी आज घटनास्थळाला आणि जखमींना भेट दिली.

**<><><><><>**

मुंबईत काल वादळी पावसामुळे होर्डिंग कोसळून झालेल्या दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर राज्याच्या विविध शहरांमध्ये आज स्थानिक प्रशासनानं होर्डिंग्सच्या मालकांना त्याचं स्ट्रक्चरल ऑडीट करण्याचे निर्देश दिले.

**पुणे** महापालिका आयुक्त राजेंद्र भोसले यांनी आज अधिकाऱ्यांची बैठक घेतली आणि होर्डिंग्सच्या सुरक्षेसाठी अतिरिक्त आयुक्तांच्या नेतृत्वाखाली एका समितीची नेमणूक केली.

**बारामती** शहरात जवळजवळ ७० होर्डिंग्स असून यापैकी एकही होर्डिंगला रीतसर परवानगी मिळाली नसल्याचं निदर्शनास आल्याची माहिती मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी दिली. सर्व होर्डिंग धारकांना आतापर्यंत दोनदा नोटीस बजावण्यात आल्याचं ते म्हणाले.

**कल्याण-डोंबिवली** महापालिकेनंही सर्वांना होर्डिंगच्या स्ट्रक्चरल ऑडिटचे निर्देश दिले आहेत.

**<><><><><>**

नाशिक जिल्ह्यात नांदगाव शहरात एसटी आणि चारचाकी वाहनाच्या अपघातात तिघेजण मृत्यूमुखी पडले. अपघातात जखमी झालेल्या दोन वर्षाच्या बालकाला उपचारासाठी नाशिकला दाखल केलं आहे.

**<><><><><>**

‘विकसित भारत २०४७ ः भारतीय बाजारपेठेसाठीचं धोरण’ या विषयावर आज मुंबईत झालेल्या संवाद सत्रात केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन सहभागी झाल्या होत्या.

<><><><><>

पुणे लोकसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे उमेदवार रवींद्र धंगेकर यांच्यावर आज गुन्हा दाखल झाला आहे. दोन दिवसांपूर्वी धंगेकर यांनी पुण्यातल्या सहकार नगर पोलीस ठाण्यात आंदोलन केलं होतं. त्यामुळे बेकायदेशीररीत्या जमाव केल्याचा त्यांच्यावर आरोप ठेवण्यात आला आहे.

<><><><><>

मुंबईत २० तारखेला मतदान होणार आहे. या प्रक्रियेत ‘एकही मतदार मागे राहू नये’ या संकल्पानुसार दिव्यांग बांधवांना मतदान केंद्रावर पोचवण्यासाठी विशेष वाहतुक सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या मतदारांसाठी २५ मार्गांवर दिव्यांग सुलभ बसेस चालवण्यात येणार असून काही ठिकाणी रिक्षा आणि इको व्हॅनची व्यवस्था करण्यात आली आहे. या सर्व सुविधा मोफत असतील अशी माहिती जिल्हा दिव्यांग समन्वयक अधिकारी प्रसाद खैरनार यांनी दिली.

लोकसभाच्या निवडणुकीसाठी मुंबई उपनगर जिल्ह्यात ८५ वर्षांपेक्षा जास्त वय असलेल्या व्यक्ती तसंच दिव्यांग अशा २ हजार ७३५ मतदारांनी गृह मतदानासाठी नोंदणी केली असून त्यापैकी २ हजार २९० मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला आहे, अशी माहिती जिल्हा निवडणूक शाखेनं दिली आहे.

<><><><><>

लोकसभा निवडणुकीच्या पार्शवभूमीवर, वायव्य मुंबई लोकसभा मतदारसंघातल्या उमेदवारांच्या दैनंदिन खर्च नोंदवह्या द्वितीय तपासणीसाठी काल निरीक्षकांसमोर मांडण्यात आल्या. या मतदारसंघातल्या २१ पैकी १९ उमेदवारांनी खर्च नोंदवह्या सादर केल्या होत्या. त्यामुळे खर्च नोंदवह्या सादर न करणाऱ्या मनोज नायक आणि

कपिल सोनी या २ उमेदवारांना तसंच खर्चात तफावत आढळलेल्या रवींद्र वायकर या उमेदवाराला नोटीस बजावण्यात आली आहे, असं निवडणूक निर्णय अधिकारी वंदना सूर्यवंशी यांनी एका पत्रकाद्वारे सांगितलं आहे.

**<><><><><>**

नंदुरबार लोकसभा मतदारसंघासाठी सोमवारी झालेल्या मतदानानंतर तब्बल 22 तासानंतर आज मतदान यंत्र स्ट्राँगरुममध्ये सील करण्याची प्रक्रीया संपन्न झाली आहे. सोमवारी मतदानानंतर नर्मदा काठावर जोरदार पाऊस आणि वादळामुळे तिथल्या मतदान यंत्रे पोहचू शकले नव्हते. तिथल्या कर्मचाऱ्यांना रात्रभर नर्मदा काठावरच्या पाच मतदान केंद्रात मुक्काम ठोकावा लागला. आज सकाळी त्यांना बार्जने केवडीया येथे नेण्यात आल्यानतंर दुपारी ही मतदान यंत्रे नंदुरबारमध्ये पोहचली. यानंतर अतिशय चोख बंदोबस्तात सीसीटीव्हीच्या निगराणी खाली ही मतदान यंत्रे सील करण्यात आली आहे.

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्याच्या प्रचारासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या नाशिकमध्ये सभा घेणार आहेत. दुपारी एक वाजता निफाड तालुक्यातल्या पिंपळगाव बसवंत इथं मोदी यांची सभा होईल. संध्याकाळी मुंबईत नरेंद्र मोदी रोड शो करणार आहेत. माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांच्या सभादेखील नाशिकमध्ये उद्या होणार आहेत.

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या सातव्या आणि शेवटच्या टप्प्यासाठी नामनिर्देशन पत्र दाखल करण्याची मुदत आज संपली. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज वाराणसी लोकसभा मतदारसंघातून भाजपा उमेदवार म्हणून आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उत्तर प्रदेशचे

मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, राष्ट्रवादी काँग्रेसचे खासदार प्रफुल्ल पटेल यांच्यासह अने नेते उपस्थित होते.

**<><><><><>**

विधान परिषदेच्या चार जागांसाठी पुढच्या महिन्यात होणारी निवडणूक, केंद्रीय निवडणूक आयोगानं पुढे ढकलली आहे. शाळांच्या उन्हाळी सुट्ट्या संपल्यावर ही निवडणूक घ्यावी, असं निवेदन निवडणूक आयोगाला मिळालं होतं. त्यानंतर आयोगानं ही घोषणा केली आहे. मुंबई पदवीधर मतदारसंघातून विलास पोतनीस, कोकण पदवीधर मतदारसंघातून निरंजन डावखरे, नाशिक शिक्षक मतदारसंघातून किशोर दराडे आणि मुंबई शिक्षक मतदारसंघातून कपिल पाटील हे ७ जुलैला विधानपरिषदेतून निवृत्त होत आहेत. त्यामुळे १० जून रोजी निवडणूक घेण्याचं आयोगानं यापूर्वी जाहीर केलं होतं.

**<><><><><>**

गडचिरोली तालुक्यात सावरगावच्या जंगलात आज सकाळी वाघानं केलेल्या हल्ल्यात एक महिला ठार झाली. ही महिला तेंदूची पानं तोडण्यासाठी जंगलात गेली होती. त्यावेळी दाब धरून बसलेल्या वाघानं तिच्यावर हल्ला करून तिला जंगलात ओढून नेलं.

**<><><><><>**

भीमा कोरेगाव प्रकरणी अटकेत असलेले गौतम नवलखा यांना सर्वोच्च न्यायालयानं आज जामीन मंजूर केला. नवलखा हे चार वर्षांपासून कैदेत होते. या प्रकरणी अद्याप त्यांच्यावर आरोपही निश्चित झालेले नाहीत. तसंच सुनावणी आणखी लांबणार असल्याचं मत नोंदवत न्यायलयानं हा जामीन मंजूर केला. गौतम नवलखा यांना त्यांच्या घरीच झालेल्या नजरकैदेच्या सुरक्षेसाठीचा वीस लाख रुपयांचा खर्च भरण्याचे आदेशही न्यायालयाने दिले आहेत.

**<><><><><>**

सिंधुदुर्गमधले यक्षगान आणि दशावताराचे अभ्यासक प्राध्यापक विजयकुमार फातर्फेकर यांनी यक्षगान मराठी भाषेत आणलं आहे. कर्नाटकमधल्या उडुपी इथल्या यक्ष संजीव यक्षगान केंद्राच्या कलाकारांनी फातर्फेकर यांनी बसवलेल्या चक्रव्यूह या नाटकाचं मराठीत सादरीकरण केलं. सावंतवाडी, वेंगुर्ले आणि कुडाळ तालुक्यातल्या आंदुर्ले इथं नाटकाचे तीन प्रयोग सादर करण्यात आले. याबद्दल विजयकुमार फातर्फेकर म्हणाले….

**होल्ड - विजयकुमार फातर्फेकर**

**<><><><><>**

माझगाव डॉक शिपबिल्डर्स लिमिटेडचा आज अडीचशेवा वर्धापनदिन आहे. यानिमित्त माझगाव गोदीत आयोजित विशेष कार्यक्रमात संरक्षण सचिव गिरीधर अरमाने यांच्या हस्ते विविध उपक्रमाचं उद्घाटन करण्यात आलं.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज नवी दिल्लीत दिल्ली कॅपिटल्स आणि लखनौ सुपर जायंट्स यांच्यात सामना होईल. नाणेफेक जिंकून लखनौच्या संघानं क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला.

**<><><><><>**

मुंबईसह कोकणात तुरळक ठिकाणी आज आणि उद्या उष्णतेची लाट राहील असा हवामान विभागाचा अंदाज आहे. येत्या दोन दिवसांत संपूर्ण राज्यात तुरळक ठिकाणी सोसाट्याचा वारे आणि मेघगर्जनेसह पावसाची शक्यता असून, कोकणात तुरळक ठिकाणी उष्णतेची लाट राहील असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**//<><><><><>//**